## मानवी हक्क (Human Rights)

**हक्क :–**

टी. एच. ग्रीन :- "मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हकक होय."

“समाजाने अथवा राज्याने मान्यता दिलेल्या मागण्या म्हणजे हक्क होय.”

नैसर्गिक हक्क:- “जे हक्क व्यक्तीला निसर्गत: अथवा जन्मत: प्राप्त होतात त्याला नैसर्गिक हक्क म्हणतात.

मूलभूत हक्क :- “ज्या हक्कांची नोंद राज्यघटनेत लिखित स्वरूपात असते व ज्या हक्कांना न्यायालयाचे कायदेशीर संरक्षण असते त्याला मूलभूत हक्क म्हणतात.”

भारतीय राज्यघटनेत कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्क आहेत.

मानवी हक्क :- जे हक्क माणसाला माणूस या नात्याने प्राप्त होतात.

संयुक्त राष्ट्राने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा मानवी हक्कांची सनद/ जाहीरनामा घोषित केला.

मानवी हक्कांची सनदेत एकूण ३० कलमे आहेत.

## मूलभूत हक्क

भारतीय राज्यघटनेत कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्क आहेत.

### सहा मूलभूत हक्क

### समतेचा हक्क ( कलम- १४  ते १८):–

- कायद्यापुढील समता ( कलम- १४ )
- भेदभाव न मानणे ( कलम- १५ )
- समान संधी ( कलम- १६ )
- अस्पृश्यता निवारण ( कलम- १७ )
- पदव्यांची समाप्ती ( कलम- १८ )

## स्वातंत्र्याचा हक्क :( कलम- १९ ते २२ )

### कलम- १९ – सहा स्वातंत्र्य

- अभिव्यक्ती स्वातंत्र्य (कलम- १९-१)
- शांततापूर्वक व निशस्त्र सभा भरविण्याचा हक्क (कलम- १९-२)
- संस्था स्थापण्याचा हक्क (कलम- १९-३)
- संचार स्वातंत्र्य (कलम- १९-४)
- वास्तव्य स्वातंत्र्य (कलम- १९-५)
- व्यवसाय स्वातंत्र्य (कलम- १९-६)

कलम २० ते २२ मध्ये स्वातंत्र्याच्या संरक्षण व्यवस्थेची तरतूद करण्यात आहे.

शोषणाविरुद्ध दाद मागण्याचा हक्क  ( कलम- २३  ते २४ )

धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क ( कलम- २५  ते २८ )

शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क ( कलम- २९  ते ३० )

घटनात्मक उपायांचा हक्क  ( कलम- ३२ )

## मानवी हक्काची वैशिष्ट्ये :

मानवी हक्क हे वैश्विक आहेत.

मानवी हक्क हे काळानुसार विकसित होणारे असतात.

मानवी हक्क हे व्यक्तीपासून वेगळे करता येत नाही.

हकक हे अनिर्बंध स्वरूपात नसतात.

हक्कांना कायद्यांची मान्यता असते.

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

मानवी हक्क संरक्षक अधिनियम -१९९३

राष्ट्रपती अध्यक्ष नेमतात.

जनहित याचिका

“जनतेचे हितसंबंध जपण्यासाठी व वैधानिक हक्कांची संरक्षणासाठी तिसऱ्या पक्षाकडून न्याय मागणे म्हणजे जनहित याचिका.”